INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.MH-659/13(N)
www.vmsindia.org

# सम्राट अशोककालीन समाज : खेळ व मनोरंजन

तागडे जि. सा.

सेठकेसरीमल पोरवाल महाविद्यालय, कामठी, जि. नागपूर (म.रा.) भारत

**सारांश :**

**प्रस्तावना :**

सम्राट अशोक जगाच्या इतिहासात आपल्या मानवतावादी तत्त्वज्ञानामुळे अतुलनीय ठरला सामाजिक व नैतिक मुल्यांना परिभाषित करणे व त्यांच्या प्रचार–प्रसाराचे महत्त्वपूर्ण कार्य त्याने धर्ममहामत्रांना सोपविले होते. अशोकाच्या पहिल्या शीलालेखात 'समाज' हा शब्द आला असून त्याच्या अर्थसंबंधाने थोडासा वाद आहे. समाज म्हणजे मेळावा जत्रा, उत्सव, विस्तीर्ण आखाडा किंवा मैदान, प्रेक्षागार, अथवा नाटक गृहाचा पर्यायवाचक आहे. थॉमस लिहतो समाज एक प्रकारचा आखाडा अथवा मैदान असून जंगी क्रिडास्थान होते. याच्या चोहीकडे प्रेक्षकांना बसण्यासाठी मंच असत. या आखाड्यात मनुष्य आणि पशुत किंवा दोन पशूंमध्ये द्वद्व युध्द होत असे. युनानी लेखक मेगॅस्थनीजही याचा अल्लेख करतो. सम्राट अशोकाच्या आठव्या शीलालेखानुसार "फार दिवसापूर्वी राजे लोक विहार (शिकार) यात्रेसाठी निघत असत" कौटिल्याने 'अर्थशास्त्रात' (८/३) मृगयेत (शिकार) व्यायाम घडतो व विकार नाहीसे होतात म्हणून त्याचे समर्थन केले आहे. चंद्रगुप्त मौर्याने बालपणी 'राजकीलम' नावाच्या खेळाचा अविष्कार केला होता. त्याच्या काळात पशुंच्या द्वंद्व युध्दा सोबतच दोन बैलांच्या मधोमध एक घोडा जूंपून रथाला खेचणारी पैज होत होती असे एलियन लिहतो. सम्राट अशोकाने पहिल्या शीलालेखात दोन प्रकारच्या उत्सवाचा उल्लेख केला आहे, पैकी पहिल्यात गाणे, नृत्य, वाजविणे, कथा, श्रवण, सिम्बल्स, टमटम, नर्तकी द्वारा सरळ दंडावर (बाबू/काडी) गातांना नृत्य प्रस्तूत करणे इ. आणि खेळ शामील होते व दुसऱ्या प्रकारच्या समाजात खाणे पिणे व मांसाअन्न शिजविले जात होते.

▪ समाज/उत्सव : "हा धर्मलेख देवांचा प्रिय प्रियदर्शी याने लिहविला आहे. येथे (या राज्यांत) कोणत्याही जिवाला मारून त्याचा बळी देण्यांत येऊ नये, किंवा समाज करण्यात येऊ नये, कारण देवांच्या प्रिय प्रियदर्शी राजाला समाजात पुष्कळसे दोष दिसतात. तथापि काही प्रकारचे समाज देवतांच्या प्रिय प्रियदर्शी राजाला पसंत आहेत."[1]

अर्थ : पहिल्या लेखात 'समाज' हा शब्द पहिल्या दोन ओळीत आला आहे. त्याच्या अर्थसंबंधाने थोडासा वाद आहे. ब्युलर म्हणतो समाज म्हणजे मेळावा किंवा जत्रा . प्रो. भंडरकरांना उत्सव हा अर्थ मान्य आहे.[2] श्रीयुत मजूमदार यांच्या मते समाज म्हणजे 'नाटक'. जातकग्रंथात याच अर्थाने 'समाज' शब्दाचा उपयोग केला आहे. व्हिन्सेंट स्मिथ यांनी प्रथम 'समाज' म्हणजे 'उत्सव' असा अर्थ केला होता. पण मागाहून ते श्री मजूमदार यांच्या मताचे झाले.[3] 'समाज' शब्दाचा सामान्यता 'अर्थ' मेळावा येथे मोठ्या संख्येने लोक एकत्र येत खात–पित पुन्हा दुसऱ्या अर्थाने समाज म्हणजे एक विस्तीर्ण आखाडा अथवा मैदान होय.[4] उत्सव समारंभास अनुलक्षूनच या शब्दाची योजना केली असावी. बौद्ध वाङ्मयामध्ये 'समाज' हा शब्द 'धार्मिक मेळावा' या अर्थाने आला आहे.[5] समाज म्हणजे चैनीखातर केलेले मेळावे व उत्सव यावर अशोकाने बंदी घातली होती.[6]

समाज, शब्द, रंग व प्रेक्षागार अथवा नाटकगृहाचा पर्यायवाचक आहे. तर कधी एकत्र जनसमूह यातून सूचित होतो. ब्राह्मण आणि बौद्ध साहित्याप्रमाणे समाज जनतेची रसना अथवा डोळे व कान तृप्त करण्यासाठी असत.[7] समाज या शब्दाचा अर्थ सेनार्टने 'आनंदोत्सव सभा'[8] ब्यूलरने 'उत्सव सभा'[9] व पिशेलने 'हांके द्वारा शिकार' केला आहे पण कोणत्याही विद्वानाने साहित्यिक साक्षीने प्रमाणित केले नाही व एका समाजाला निंदनीय व एकाला प्रशंसनीय म्हटले आहे.[10] बौद्ध साहित्यात 'समज्ज' अथवा 'समजो' शब्द सभेच्या अर्थाने वापरला आहे. या शब्दाचे धार्मिक महत्त्व असून सामान्य आनंदमय उत्सवांसाठीही या संज्ञेचा प्रयोग केला आहे.[11]

थॉमसने महाभारतातील (१/१८५,२९) या संदर्भाच्या आधारे एका आखाड्यात उत्सवामध्ये (समाज) खेळ होत यांच्या चारही बाजूंनी मंच असून हा खेळ पशूंची लढाई राहली असेल. समाज व्युत्पत्तीची मूळ व्याख्या तीच आहे जी इंग्रजीत meet शब्दाची आहे.[12] महाभारतात याचा उल्लेख एक 'शैव उत्सव' रूपात केला आहे. 'रामायणात' म्हटले आहे,'उत्सवश्च समाजश्च वर्धन्ते राष्ट्रवर्धनम्' अर्थशास्त्राच्या टीकाकारानुसार यात्राचा आशय 'देवतांची यात्रा' उत्सवचा अर्थ 'इन्द्रोत्सव' व 'वसंतोत्सव' इ. आणि प्रवहण याचा अर्थ उद्यान, भोजादी आहे.[13] वात्सायनाच्या 'कामसूत्रात' समाज शब्द सामान्य अर्थाने आला असून सरस्वतीच्या मंदिरात प्रती मास अथवा प्रती पक्ष समाज होत असे. येथे स्थानिक व बाहेरील कलावंत नृत्य व संगीताचे प्रदर्शन करीत या निमित्त एकत्र घेणाऱ्या जनसमूहाला कामसूत्रात 'समाज' म्हटले आहे.[14] समाज शब्दाशी अशोकाचा निश्चित अर्थ काय होता हे सांगता येत नाही. ब्यूलरनुसार समाज एक प्रकारचा 'मेळावा' होता यात लोक एकत्र येऊन खाणे पिणे करीत. व्हिन्सेंट स्मिथ म्हणतो समाज एक प्रकारचा 'उत्सव' असून कदाचित वर्षातून एकदा पाटलिपुत्र येथे साजरा केला जात असे.[15]

एन.जी. मजूमदारने १९१८ च्या 'इंडियन एंटिक्वैरी' नामक पत्रात समाजाचा अर्थ 'प्रेक्षणक' कथा नाटक असा केला आहे. याच्या समर्थनार्थ त्यांनी कामसूत्र (पेज.४९–५१ चौखंभा सीरीज) प्रमाण घेतले. जातकात समाज 'नाटक' या अर्थाने प्रयुक्त झाला आहे. (कणवेर जातक) रामायणात समाज

कदाचित याच अर्थाने आला आहे.[16] अमरकोषटीकेत समाज याचा अर्थ 'निकाय' अर्थात 'मनुष्यांचे संमेलन' जनसमुदाय असा केला आहे.[17]

▪ बौद्ध साहित्यातील समाज : 'धम्मपदा'त वर्णन आले आहे की; राजगृह येथील नाटक खेळणाऱ्या लोकांची (नाटका–Company of actors) एक बृहत्त संस्था असून (यात कधी– कधी ५०० पर्यंत कलावंत राहत) उपस्थित लोक नृत्य, गाणे, वाजविणे करून राजाला प्रसन्न करीत; राजा प्रसन्न झाला असता बक्षीस मिळत असे. राजाने अशा प्रकारच्या उत्सवांना प्रतिबंधित केले. ज्यामुळे व्यभिचार पसरण्याची आशंका असे. सामाजिक उत्सव साप्ताहिक, सहामाही व वार्षिकही असत विनयपिटकात उल्लेख मिळतो की; राजगृह येथील पर्वतावर दोन प्रकारच्या समाजाचे आयोजन केले जात असून पहिल्यात– नृत्य, संगीत, ध्वनी व गाणे आणि द्वितीय मेजवाणी दिली जात होती. जातक ग्रंथातही समाज शब्दाचा उल्लेख आला आहे. सांसरिक समाज शिबिर (sibikas), डेरे (camps), तमाशा, मंच व प्लॅटफार्म इ. वर सोबत रंग प्रेक्षागार आणि रंगशाळा (मंचतिमंचेठित), इ.वर आयोजित केले जात याचे मुख्य आकर्षन प्रधान नर्तकीद्वारा सरळ दंडावर गातांना (बांबू/काडी) नृत्य प्रस्तुत करणे होते. याच स्थानावर हे वर्णन आहे की; अशा प्रकारे हे नट गाव, शहर व राजधानीत हिंडत–फिरत आपल्या कलांचे प्रदर्शन करीत, तेव्हा आता एका सुधारणावादी राजाने याला थांबविण्याचा प्रयत्न केला.[18]

विनयपिटकात राजगृहातील एका अशा समाजाचे वर्णन आले आहे. ज्यात गीत व संगीताचे आयोजन होत असे. (२,३,२,६) व एका अन्य समाजात भोजही (मेजवानी) होत असे. जातकात या शब्दाला अनेक अर्थाने वापरले आहे. जसे जातक ३, ५४१,२० (गृहयुद्ध) ३१८,५४५, खारवेलच्या अभिलेखात व नासिक गुहालेखात समाजाचा उल्लेख आला आहे.[19] स्वयंवर संस्काराचे आयोजन करून नृत्य, संगीत आणि ध्वनी इ. माध्यमातून संपन्न करीत[20] बौद्धधर्म निंद्यनीय समाजाला चांगल्या दृष्टीने पाहत नाही 'सिगालोवादसुत्तात' (दीघनिकाय) बुद्धांने अशा गृहस्थांची भर्त्सना (निंदा) केली जे समाजात खूप अधिक जातात. अशोकाने शुद्ध मनोरंजन करणाऱ्या समाजाला (समाजा साधुमता) प्रोत्साहन देऊन त्याला आपल्या धर्मप्रचारांचे माध्यम बनविले होते.[21]

ज्या समाजाला निंद्य मानले गेले त्याची परिभाषा दीघनिकायातील ब्रह्मजालसुत्तामध्ये दिली असून यात सहा गोष्टी होत. नाच, गाणे, संगीत, वाजविणे (वाजतंत्री) कथा श्रवण, सिम्बल्स (cymbols) नगाडे, टमटम यात अनेक निंद्य प्रदर्शनांचा (विसुकदस्सनम्) उल्लेख आला आहे. ज्यात हत्ती, घोडे, म्हशी, बैल, सांड, बकरा–बकरी, मेंढा, पोपट, रॅम्स (Rams), कोंबडा, तोता (पोपट), लावा पक्षी व इतर पक्ष्यांच्या लढाईचे (झुंज) आयोजन होत होते. याच प्रकारचे उदाहरण 'ब्रह्मजालसुत्तात' मिळते ज्यात बनावटी प्रकारांचा निषेध केला आहे. यापैकी एक 'पेक्खम' असून बुद्धघोषाने त्याची व्याख्या नट समज्जा केली आहे. अशोक बहुतेक अशा प्रसंगी प्रजेसाठी स्वर्गीय दृश्यांचे (विमान, हत्ती, अग्निस्कंध इ.) प्रदर्शन करीत होता.[22]

● महाभारतकालीन समाज (उत्सव) : समाजाचे संस्कृत ग्रंथात समान्य रूपात उल्लेख मिळत असून महाभारतात समाज शब्द शैव उत्सव रूपात आला आहे. यात मद्यपान व नाच गाणे होत असून[23] सर्व दिशेतून हजारोंच्या संख्येत मल्ल एकत्र होत, ते महाकाय आणि महावीर्य असून शक्ती मध्ये कालकंज संज्ञक असुरा समान होते. महाभारतात वर्णित समाजात मल्ल अथवा नियोधकाः एकत्र होऊन युद्ध करीत आणि लोक ते पाहून आनंदाचा अनुभव करीत. या प्रकारच्या समाजात अशोक दोष पाहत होता.[24] महाभारताच्या विराटपर्वात ह्या प्रकारच्या समाजाचा स्पष्टपणे उल्लेख आहे. हे राजा, ब्राह्मण व पशुपती (शिव) ह्यांच्या सन्मानार्थ होत असत.[25]'थॉमस म्हणतो समाज एक प्रकारचा विस्तीर्ण आखाडा अथवा मैदान असून याच्या चोहीकडे प्रेक्षकांना बसण्यासाठी मंच असत या आखाड्यात मनुष्य आणि पशूत किंवा दोन पशूंमध्ये द्वंद्व युद्ध होत असे याच भयानक उत्सवाला अशोकाने अभिलेखात मनाई केली आहे.'[26]

● कौटिलीय अर्थशास्त्रातील समाज : गुप्त हेरांची योजना–संकर्षण (बलराम) देवतेचा भक्त असल्याचा बहाणा करणाऱ्या मुंड अथवा जटाधारी साधूच्या वेषातील हेराने उत्सवाच्या निमित्ताने दारूत मदनरस मिसळून (दरोडेखोरांना) फसवावे नंतर त्यांच्यावर हल्ला करावा किंवा मद्यविक्रय करणाऱ्या वेषातील हेराने देवतांचे उत्सव, प्रेतकार्य, मेळावे या प्रसंगी दारू विकण्याच्या किंवा भेट देण्याच्या निमित्ताने (अरण्यातील टोळ्यांना) मदनरसाच्या मिश्रणाने फसवावे.[27] अर्थशास्त्रानुसार कुटुंबीयांना समारंभाच्या प्रसंगी किंवा औषधासाठी अरिष्ट अथवा दुसरे एखादे मद्य स्वतः तयार करण्यास परवानगी असावी. उत्सव, मेळावे आणि यात्रा याप्रसंगी चार दिवस मद्य तयार करण्याची परवानगी द्यावी. ज्यांनी परवानगी घेतली नाही त्यांच्याकडून त्या दिवसांत समारंभ संपेपर्यंत रोजचा दंड वसूल करावा.[28] विजिगीषू (विजयी) राजाने त्या देशातील देवतांचे उत्सव सामाजिक उत्सव व समारंभ याप्रसंगी तेथील लोकांसारखाच भक्तिभाव दाखवावा.[29] राजाने संरक्षणासंबंधी दक्षता घेतांना जत्रा, मेळावे, उत्सव आणि समारंभ यांसारख्या प्रसंगी दहा दहा सैनिकांवर असलेल्या अधिकाऱ्यांच्या देखरेखीची व्यवस्था करून मगच उत्सवात जावे.[30] कौटिल्याने 'अर्थशास्त्रात' (८/३) मृगयेचे (शिकार) समर्थन केले आहे मृगयेत व्यायाम घडतो. कफ, पित्त, मेद आणि घाम (फार येणे) हे विकार नाहीसे होतात, स्थिर व चल शरीरावर नेम धरून मारण्याचा अभ्यास होतो, पशूंना क्रोध आला असता, भय वाटत असता आणि ते स्वस्थ असता त्यांच्या चित्ताच्या विकाराचे ज्ञान होते; शिवाय मृगयेवर कायमचे जाण होत नाही.[31] सम्राट अशोकाच्या आठव्या शीलालेखानुसार "फार दिवसापूर्वी राजे लोक विहार (शिकार) यात्रेसाठी निघत असत"

पहिल्या शीलालेखानुसार केवळ पशूंच्या यज्ञीय हिंसेमध्ये नव्हे तर काही समाजात किंवा महोत्सवी मेळाव्यातही गुन्हेगारी असते. असे अशोक मानीत असे; अशा मेळाव्यांच्या प्रसंगी राजे व सम्राट उपस्थित असल्याचे कौटिलीय अर्थशास्त्रावरून समजते.[32] कौटिलीय अर्थशास्त्र–उत्सव, समाज व यात्रा यांचा उल्लेख केला असून यात पुष्कळ दिवसापर्यंत कोणत्याही अडचणी शिवाय अविरत 'पान' मद्यपान चालत असे. कौटिल्य सांगतो की; विजयी राजाचे कर्तव्य आहे की; त्याने राष्ट्रप्रेम, धर्म (देश, दैवत) व त्यांच्या (हारलेला राजा) उत्सव, समाज व विहारांचा आदर करावा.[33] मेगॅस्थनीज व इतर युनानी लेखकांनी मनुष्य, हत्ती, सांड व इतर पशूंच्या मल्ल युद्धांचा उल्लेख केला आहे. मृगया (शिकार) मनोरंजनाचे साधन असून जनतेच्या मनोविनोदासाठी मृगवन, चिडियाघर व सर्पगृहाची व्यवस्था होती[34] चंद्रगुप्त मौर्याने बालपणी 'राजकीलम' नावाच्या खेळाचा अविश्कार केला होता या

खेळात तो राजा बनून इतर बालकांना न्यायाधीश, राज कर्मचारी, चोर, डाकू, इ. बनवून राजाच्या आसनावर बसून आरोपीची पेशी, वादी–प्रतिवादी यांचे ऐकून घेतल्यावर निर्णय देत असे. हा खेळ पाहून तक्षशिलेचा आर्य चाणक्याने बालाकचे नेतृत्व, गुण, क्षमता पाहून गोपालकाकडून १००० कार्षापण देऊन त्याला हस्तगत करून घेतले.एलियननुसार अशोकाचा आजोबा चंद्रगुप्त मौर्य प्रती वर्षी एक मेळावा (उत्सव) आयोजित करीत होता. ज्यात मेंढे, सांड, जंगली (रान) म्हशी, हत्ती, गेंडा इ. झुंज करविली जात होती व दोन बैलांच्या मधोमध एक घोडा जुंपूण रथाला खेचणारी पैज होत होती.[35] अशोकाने या सार्वजनिक प्रदर्शनावर प्रतिबंध लावला. या प्रदर्शनाचे आयोजन पूर्वी स्वतः अशोक करीत होता.[36]

▪ अशोककालीन समाजाचे प्रकार : प्राचीन काळी दोन प्रकारचे उत्सव होते. एकात नुसते गाणेबजावणे व खेळ, कुस्त्या वगैरे गोष्टी होत असे. दुसऱ्यांत हे प्रकार असून शिवाय सामीष भोजनही होत असे. यापैकी अशोकाने ज्या समाजाला मनाई केली तो हा दुसऱ्या प्रकारचा उत्सव असावा ज्यात हिंसा होत असे.[37] थॉमस याच्या मते समाज म्हणजे एक जंगी क्रीडास्थान किंवा आखाडा असून त्याच्या चोहीकडे दर्शकांना बसण्यासाठी मंच बनले असत. माणसामाणसात किंवा मनुष्य आणि पशू यांच्यात द्वंद्वयुद्धे चालत; ही युद्धे क्रूरपणाची म्हणून अशोकाने मनाई केली असावी.[38]

अशोक बौद्ध होण्यापूर्वी प्रजेसाठी मेजवाणी आणि सार्वजनिक मनोरंजनाची व्यवस्था करीत असे यात समाज (उत्सव) करीत होता. तर दुसऱ्या प्रकारच्या समाजाचे ध्येय मनोरंजन होते[39] यात नाटक, संगीत व नृत्य असे मनोरंजनाचे कार्यक्रम प्रस्तुत केले जात. तर काही प्रसंगी मांस आणि मद्य यांची मेजवाणी होत असे. दुसऱ्या प्रकारच्या समाजात नियंत्रित लोकांच्या विशाल जनसमूहाला मांस खाऊ घालण्यासाठी पुष्कळ प्राणी मारले जात असत व राजवाड्यात प्रतिदिवसी भिक्षेत प्रजेला मांस दिले जात असे. 'समाज' यात (उत्सव) भिक्षा देण्यासाठी अपेक्षित जीव निश्चितच मारले जात. अशोकाने याला पूर्णपणे प्रतिबंधित (प्राणी हत्या) केले नाही; परंतु त्यावर अंकुश मात्र लावला.[40]

लौकिक समाज रंग अथवा प्रेक्षागारमध्ये होत असत. यात शिबिका व विभिन्न श्रेणीच्या गणासाठी मंच होते. येथे सार्वजनिक भोजासाठी लोक एकत्र होत यावेळी विविध मांसाहारी व्यंजन तयार करीत, शास्त्राचे दंगल होत. (हरिवंश–४५२८–३८, ४६४२,५८), सैनिक प्रदर्शन होत. (आदि पर्व–अध्याय–१३४ व पुढे), भंडारकर म्हणतात 'समाज'त स्वंयवरांचे आयोजन केले जात असून यात नृत्य, गाणे, संगीतही होत असे.[41]

देवदत्त रामकृष्ण भंडारकरने महाभारत, हरिवंश आणि बौद्धग्रंथाच्या आधारे सिद्ध केले की; प्राचीन काळात दोन प्रकारचे समाज अथवा उत्सव होत. अशोकाने पहिल्या शीलालेखात दोन प्रकारच्या उत्सवांचा उल्लेख केला आहे. पैकी पहिल्यात गाणे, वाजविणे आणि खेळ होत व दुसऱ्या प्रकारच्या समाजात खाणे–पिणे व मांसाअन्न शिजवले जात असे. ज्यात पशुहिंसा व मांस खाल्ले जात असे अशा समाजाला त्याने मनाई केली. अशोकाने पहिल्या प्रकारच्या समाजात ज्याला तो पसंत करीत त्यात (उत्सव) सुधारणा करून त्याला धर्म प्रचाराचे साधन केले. चौथ्या शीलालेखात विमान, हत्ती व आतिशबाजी अशा दिव्यरूप प्रदर्शनांचा उल्लेख झाला याचा वापर दुसऱ्या प्रकारच्या समाजात (उत्सव) दिसून येतो.[42]

सामाजिक जीवनात जन्मोत्सव, विवाहोत्सव याप्रसंगी विशेषतः रूपावान स्त्रियां विविध प्रकारच्या मंगलचाराद्वारा मनोरंजन करीत ह्यांचा उल्लेख नवव्या शीलालेखात आला आहे.[43] लौकिक 'समाज' एखादी रंगशाळा अथवा प्रेक्षागारात आयोजित केले जात. येथे विभिन्न श्रेणी व गणांचे वेग वेगळे शिबिर लागत आणि मंच असत. येथे मेजवाणी मल्लयुद्ध, गायन, नृत्य, वादन आणि स्वयंवरही होत.[44]अशोकाने 'समाज'त (महोत्सवात) होणारी मानव हत्या, यज्ञातील प्राणी हत्या आणि गलिच्छ निरुपयोगी व संतापजनक विधीचे आचरण ह्यांच्या विरुद्ध त्याने युद्ध पुकारले होते.[45] अशोकाने शासन प्रबंधात सामाजिक परिवर्तन करून जीवनाचा स्तर उंचावण्याचा प्रयत्न केला. यासाठी त्याने काही हिंसक समारंभ व उत्सव, गोष्टी (सम्मेलन) यांना प्रतिबंधित करून मद्य, मांस, नृत्य इ. वेळ व धन व्यय होत असे; त्याला थांबविण्याचा अशोकाने पूर्ण प्रयत्न केला.[46] त्याऐवजी आता निश्चितच अशा सभा, गोष्टी, समारंभ जसे धर्मपरिषद, धर्मसम्मेलन इ. कोणत्याही अडचणी शिवाय होऊ शकत होते.[47] धर्मचर्चेखेरीज जमलेला इतर मेळावा आणि त्यापायी होणारा खर्च हा अनाठायी आहे; असे राजाचे मत दिसते.[44] यज्ञातील पशुहत्या आणि यज्ञाच्या निमित्ताने जमणारा जनसमुदाय यामध्ये निष्कारण वेळ आणि पैसा यांचा अपव्यय करतो असे राजास वाटत होते.[49]

अशोक दोन्ही प्रकारचे समाज करीत असे परंतु जेव्हा त्याने धम्म प्रचारास सुरवात केली तेव्हा दुसऱ्या प्रकारचे समाज ज्यात नाच–गाणे, मद्य व मेजवाणींसाठी पशुंचा वध होत असे प्रतिबंधित करून सार्वजनिक दिव्यप्रदर्शनांचे आयोजन केले. जेणेकरून प्रजेच्या मनोरंजनासोबतच धम्माची उत्पत्ती, विकास, प्रचार–प्रसार (धर्ममहामात्रांद्वारा) होईल.[50] संपुर्ण वर्णनावरून स्पष्ट आहे की अशोकाच्या काळात जे समाज होत त्यात संगीत, नृत्य, मांस मदिरापान, खेळ आणि विविध प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन केले जात असे.

संदर्भ ग्रंथ सूची

1) आपटे, वासुदेव गोविंद, अशोक चरित्र, समन्वय प्रकाशन, ६७८, ई. निदान हॉस्पिटलसमोर, शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर, आवृत्ती, २०१३– १–पृ.६७, ३–पृ.६७–६८, ६–पृ.१०१, ३६–पृ.३७–३८

2) ओझा, रामप्रकाश, अशोक, प्रकाशन केन्द्र रेल्वे क्रासिंग, सीतापुर रोड, लखनऊ–२२६०२, प्र.सं.– 18–पृ.96–97, 20–पृ.96–97, 22–पृ.96–97, 23–पृ. 96–97

3) कुमार, कृष्ण, अशोक के अभिलेखों का ऐतिहासिक एवं सांस्कृतिक अध्ययन, भारत प्रकाशन, १७, अशोक मार्ग, लखनऊ, सं. २०१३– ४३–पृ.१५४

4) कौटिल्य, भाषांतरकार कंगले, र.पं., कौटिलीय अर्थशास्त्र (मूळ संस्कृत), महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ मंत्रालय, मुंबई–४०००३२, पुनर्मुद्रण, २०११– २७–पृ. ५८१, २८–पृ.१७३, २९–पृ.५९०, ३०–पृ.६४, ३१–पृ.४६७, ३३–पृ.१७३

5) गोखले, शोभना, पुराभिलेखविद्या, अनिरुद्ध अनंत कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे–३०, द्वि.आ. २००७– ५–पृ. १०७, ४८–पृ.१०७, ४९–पृ.१०७

6) गोयल, श्रीराम, प्रियदर्शी–अशोक, कुसुमांजली प्रकाशन, रंजन बिल्डिंग, पी.एल. शर्मा, रोड, बेगम ब्रिज, मेरठ–२५०००१, प्र.सं. १९८८– १३–पृ.९०–९१, १७–पृ.९०–९१, २१–पृ.९०–९१, ३५–पृ.९०–९१, ४४–पृ.९०–९१

7) थापर, रोमिला, अनुवादक–चौधरी, डी.आर; यादव, राजेशप्रभा; सिंह, आदित्यनारायण, अशोक और मौर्य साम्राज्य का पतन, ग्रंथ शिल्पी (इंडिया) प्राइवेट लिमिटेड, बी–७, सरस्वती कामप्लेक्स,

सुभाष चौक, लक्ष्मी नगर, दिल्ली–११००९२, परिवर्ध्दित संस्करण २००५–[११–पृ.१४८]

8) प्रसाद, ओम प्रकाश, संघाधिपति अशोक, हिन्दी माध्यम कार्यान्वय निदेशालय, बैरक नं. २, केवेलरी लाईन, दिल्ली–११००७, प्र.सं. १९९९–[४–पृ.१७९, १५–पृ.१४६–१४७, १६–१४६–१४७, ३७–पृ.१७९, ४२–पृ.१४६, ४६–पृ.४६]

9) भट्ट, जनार्दन, अशोक के धर्मलेख, निदेशक प्रकाशन विभाग, सूचना और प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, पटीयाला हाऊस, नई दिल्ली–११०००१, द्वि.सं.२०००–[१–पृ.३३, ३६–पृ.३३, ४७–पृ.१२]

10) भंडारकर, डी. आर.,अशोक (हिन्दी अनुवाद), एस.चंद ॲन्ड कंपनी, फव्वारा, दिल्ली, मुद्रक–क्रॉनिकल प्रेस, मोरी गेट दिल्ली–०६, कारमाइकेल व्याख्यान १९२३–१९३२–[७–पृ.२१–२२, १०–पृ.२७९–२८०, ३९–पृ.२१–२२, ४०–पृ. १५३–१५४, ५०–पृ.२१–२२]

11) मुखर्जी, राधाकुमुद, अशोक, मोतीलाल बनारसीदास, ४१, यु.ए. बंगलो रोड, जवाहरनगर, दिल्ली–०७, पुनर्मुद्रण २००४–[१२–पृ.१०९, १४–पृ.१०९–११०, १८–पृ.१०८–१०९, १९–पृ.१०९, २२–पृ.१०८–१०९, ३३–पृ.१०९, ४१–पृ.१०९]

१२) रायचौधुरी, हेमचंद्र अनुवाद–आठवले सदाशिव; बोपर्डीकर मधुसुदन, प्राचीन भारताचा राजकीय इतिहास, डायमंड पब्लिकेशन्स, १६९१, शंकरप्रसाद को.हौ. सोसायटी, तिसरा मजला, टिळक रोड, सदाशिवपेठ, पुणे–३०, मराठी, प्र.आ. २००६–[२५–पृ.३२२–३२३, ३२–पृ. ३२२–३२३, ४५–पृ.३१८]

13) विद्यालंकार, सत्यकेतु,मौर्य साम्राज्य का इतिहास ,श्री सरस्वती सदन, ए–१ / ३२, सफदरजंग इन्क्लेव, नई दिल्ली–११००२९, आठवा सं.२०१०–[२४–पृ.६०४–६०४]

14) शर्मा, कृष्णगोपाल; शल्य, कमलनयन; शर्मा, मुरारीलाल,प्राचीन भारत का इतिहास,अजमेरा बुक कम्पनी, त्रिपोलिया बाजार, जयपूर–३०२००२,पंचम सं. २००३–[३४–पृ.२५४]

15) Epigraphia Indica (E.I.)- [९(II)-पृ.४६६]

16) Indian Antiquary, Mumbai (I.A.)- [३(१९१०)–पृ.२३५, ८(ix)–पृ.२८६]

17) Journal of Royal Asiatic Society, London (J.R.A.S.)- [२(१९१४)–पृ.३९२, २६(१९१४)–पृ.३९२, ३८(१९१४)–पृ.३९२]

*****